**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय, साकोली, जि. भंडारा यांचे न्यायालय**
**(पिठासीन अधिकारी वि. म. गायकवाड)**

MHBH080003192024

**सं. फौ. ख.क्र. २०६/२०२४**
**महा. शासन –वि– धनंजय**
**नि.क्र.०७ वर पुढे**

## <u>न्या य नि र्ण य</u>

(दिनांक १३, माहे ऑगस्ट, २०२६ रोजी घोषीत)

न्यायालयासमोर आलेला तोंडी व लेखी पुरावा, सहायक सरकारी अभियोक्ता श्री. तौसिफ खान व आरोपीतर्फे विद्वान वकिल श्री. एस. सी. बोरकर यांच्या तोंडी युक्तीवादावरून प्रस्तुत प्रकरण निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे माझ्या निदर्शनास आले असून त्यावरील माझे निष्कर्ष खालील कारणासह देत आहे.

| **अ. क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने संशयापलीकडे हे सिध्द केले काय की, दिनांक २२/१२/२०२३ रोजी १९/४५ वा. ते २०/३० वा.दर. वाजताच्या दरम्यान मौजा निलज टोली, ता. साकोली, जि. भंडारा येथे आरोपीच्या ताब्यातुन देशी दारु संत्री चे १८० मि.ली.नी भरलेले एकुण ०५ पव्वे एकूण किंमत रुपये ३५०/– विना परवाना अवैधरित्या बाळगतांना मिळून आला आणि त्यावरुन आरोपीने महाराष्ट्र दारु बंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये दंडनिय अपराध केला ...? | **....नाही.** |
| २ | कोणता आदेश ...? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

VISHAL MAHANAND GAIKWAD
Digitally signed by VISHAL MAHANAND GAIKWAD
Date: 2026.08.13 18:01:06 +0530

### –: <u>निष्कर्षामागील कारणे</u> :–

**२. <u>मुद्दा क्रमांक १ व २ ला अनुसरुन:–</u>**

अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता एक साक्षीदार तपासला. आरोपीने स्वत:च्या बचावा करीता कोणताही तोंडी किंवा लेखी पुरावा दिला नाही.

३. **दिपक (स.सा.क्र.१)** यांना अभियोग पक्षाने घटनास्थळ आणि जप्ती पंच म्हणून तपासले. त्याने आपल्या साक्षपुराव्यात पोलीसांनी त्यांना पंचनाम्याची कारवाई करण्याकरीता बोलाविले नसल्याचे व तो रस्त्याने जात असतांना पोलीसांनी त्याला थांबवून त्याची सही घेतल्याचे सांगितले. त्यांनी अभियोग पक्षाला कोणतेही समर्थन केले नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उलट तपासातील अनुदेय असलेले उत्तर सुचक प्रश्न विचारले असता घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील आपल्या सही व्यतिरीक्त इतर कोणताही मजकूर त्यांनी मान्य केला नाही. म्हणून त्यांचा तोंडी पुरावा अभियोग पक्षाकरीता उपयोगी ठरणार नाही.

४. अभियोग पक्षाने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(ई) प्रमाणे दोषारोप सिद्ध करण्याकरिता आरोपीने सर्वप्रथम मादक द्रव्य बाळगुन ती विना परवाना विक्री करीता आपल्याजवळ बाळगली होती, हे सिद्ध करणे आवश्यक आहे. त्याकरीता अभियोग पक्षाने तपासलेल्या एकमेव पंच साक्षीदाराचा तोंडी पुरावा वाचला असता त्यांनी आपल्या तोंडी पुराव्यात अभियोग पक्षाला कोणतेही समर्थन केलेले दिसून येत नाही. त्यांच्यासमोर कोणत्याही पंचनाम्याची कार्यवाही झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. प्रकरणातील दुसरे पंच साक्षीदार दिपरत्न प्रदिप उके हे न्यायालयाच्या साक्ष समन्स नुसार पुराव्याकामी न्यायालयात हजर झाले नाही. सदर पंच साक्षीदार हे अभियोग पक्षाचे स्वतंत्र साक्षीदार होते. परंतु, त्यांनी आरोपीकडून दारु जप्ती झाल्याची बाब नाकारली आहे. त्यामुळे जप्तीची कार्यवाही ही संशयास्पद वाटते.

VISHAL MAHANAND GAIKWAD
Digitally signed by VISHAL MAHANAND GAIKWAD
Date: 2026.08.13 18:01:14 +0530

५. पुढे जप्त मुद्देमाल हे दारु आहे किंवा कसे याबाबतचा रासायनिक चाचणी अहवाल अभियोग पक्षाने अभिलेखावर सादर केलेला नाही. त्यामुळे जप्त रसायन हे दारु आहे हे निश्चीतपणे सांगता येत नाही. तसेच, ज्या परीस्थितीत मुद्देमाल जप्त केला व त्यांचे नमुने चाचणीकरीता घेतले होते त्याबाबतचे पंच साक्षीदार हे अभियोग पक्षाला समर्थन करीत नाहीत. त्यामुळे केवळ पंच साक्षीदारांना तपासून अभियोग पक्षाने आरोपीविरुद्धचे दोषारोप संशयापलीकडे जावून सिद्ध केले असे म्हणता येणार नाही. उपरोक्त प्रकरण प्रलंबित ठेवून कोणतेही फलप्राप्त होणार नाही. करीता नि.क्र.०१ वर आदेश पारीत करुन सरकारी पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

६. अभिलेखावरील पुराव्याचा व प्राप्त परीस्थितीचा विचार केला असता घटनेच्या दिवशी आरोपीच्या ताब्यातुनदेशी दारु संत्री चे १८० मि.ली.नी भरलेले एकुण ०५ पव्वे

एकूण किंमत रुपये ३५०/– मिळून आल्याची बाब अभियोग पक्षाला सबळ, सुस्पष्ट व निर्णायक पुरावा देवून सिध्द करता आली नाही. पर्यायाने आरोपीवर लावण्यात आलेले आरोप महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम कलम ६५(ई) चे दोषारोपपत्र सिध्द होत नाही. आरोपी निर्दोष सोडण्यास पात्र आहे. म्हणून मुद्दा क्र.१ चे उत्तर 'नकारार्थी' देवून मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी **धनंजय शामदेव लांजेवार**, यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७८ नुसार महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) च्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयिक्तक जाचमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ४८१ च्या पुर्तीकरीता त्याने रु. १५,०००/– चा जामीन मुचलका सादर करावा.

४. जप्त मुद्देमाल देशी दारु संत्री चे १८० मि.ली.नी भरलेले एकुण ०५ पव्वे बाटल्या अपील कालावधी समाप्तीनंतर राज्य उत्पादन शुल्क कार्यालय साकोली, यांच्याकडे कायदेशीररित्या विल्हेवाट लावण्याकरिता पाठविण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

VISHAL MAHANAND GAIKWAD
Digitally signed by VISHAL MAHANAND GAIKWAD
Date: 2026.08.13 18:00:51 +0530

साकोली
दि. १३/०८/२०२६.

(**वि. म. गायकवाड**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, साकोली